Maya CARE Foundation
The next best thing to family

# माया केअर फाऊंडेशन

News Letter

## ✻ वार्तापत्र ✻

वर्ष : 3 रे •अंक : 2 रा
जानेवारी – मार्च 2024
केवळ खाजगी वितरणासाठी विनामूल्य

# संपादकीय ...

2023 वर्ष संपले आणि या वर्षात भारतात खूप अभिमानास्पद गोष्टी घडल्या. जगातील सकल वैयक्तिक उत्पादनात भारताचा ग्रोथ रेट हा सर्वोच्च ठरला तो म्हणजे 6.3% ,दुसरे म्हणजे पर कॅपिटा उत्पन्नात सुद्धा आपण इंग्लंडला मागे टाकून, जगात पाचव्या नंबरवर उडी घेतली .भारताच्या राष्ट्रपती या पदावर बसण्याचा मान प्रथमच एक आदिवासी महिलेला मिळाला . नवीन संसद भवनची इमारत तयार झाली आणि त्यात पहिलेच विधेयक स्त्रियांचे सक्षमीकरण करणारे म्हणजे स्त्रियांसाठी संसदेत राखीव जागा देण्यासाठीचे एकमताने मंजूर झाले. भारताचे चांद्रयान प्रथमच चंद्रावर पोहोचले . जगातील सर्वात जास्त लोकसंख्येचा देश म्हणून भारताची यावर्षी गणना झाली .

9 डिसेंबर 2023 या दिवशी आपल्या संस्थेचा वर्धापन दिवस पुण्यात साजरा झाला. या वर्धापन दिनासाठी भरपूर साहाय्य भारतातील आघाडीची सॉफ्टवेअर कंपनी पर्सिस्टंट सिस्टिम्स या संस्थेने केले. याबाबत एक लेख या अंकात दिलेला आहेच. पर्सिस्टंट सिस्टिम्स या कंपनीने केलेल्या सहकार्याबाबत त्याचे आम्ही अत्यंत आभारी आहोत .

आपली संस्था ज्येष्ठ नागरिकांची मोफत सेवा करतेच आहे परंतु ही सेवा करणेसाठी बॅक ऑफिस मध्ये जे कर्मचारी असतात ते सर्व दिव्यांग आहेत हे आपल्या संस्थेचे एक महत्वाचे वैशिष्ट्य आहे. जागतिक बँकेच्या आकडेवारीवरून असे दिसून आले आहे की भारतामध्ये अपंग व्यक्तींची संख्या सहा कोटी च्या दरम्यान आहे, ज्यामुळे भारत हा जगातील सर्वात जास्त अपंग लोक असलेला देश बनला आहे. अपंगत्व हे अत्यंत आव्हानात्मक आहे आणि त्यासोबत जगणाऱ्या व्यक्तीला सर्वात मूलभूत हक्कांसाठी आणि मुख्य प्रवाहात सामील होण्यासाठी दररोज लढा द्यावा लागतो. ज्यांना अपंगत्व आहे आणि गरीब घरातून आलेले आहेत त्यांची अवस्था आणखी वाईट आहे आणि त्यांना शिक्षण, प्रशिक्षण आणि पुनर्वसन मिळण्यात अधिक अडचणी येतात. जागतिक कोविड–19 संकटामुळे अपंग व्यक्तींना सर्वाधिक फटका बसला.

आमच्या संस्थेत आम्ही 1200 पेक्षा जास्त दिव्यांग लोकांना रोजगार दिलेला आहे . यापैकी 80% स्त्रिया आहेत. आम्ही काही कंपन्यांचे बीपीओ सांभाळतो आणि त्यात सर्व दिव्यांग व्यक्ती काम करतात . दिव्यांग लोकांना सुरवातीला ट्रेनिंग तर आम्ही देतोच म्हणजे कॉम्प्युटर चे ट्रेनींग ,झूम कॉल कसा करायचा, नंतर बीपीओ कंपनी सुद्धा ट्रेनींग देते आणि त्याचे बीपीओ ते आमचे दिव्यांग कर्मचारी सांभाळतात. सध्या सहा कंपन्यांचे बीपीओ आमच्याकडे आहेत, तसेच आमची टीम कंपन्यांची डेटा एंट्री करून देतो. ICICI लोंबार्ड यांचे डेटा एंट्रीचे सध्या काम आमच्याकडे आहे . कंपन्यात प्लेसमेंट सुद्धा आम्ही करतो आम्ही इंडिगो एअरलाईन्स चे डेटा एंट्रीचे काम सुद्धा करून देतो.

माया केअर फाऊंडेशन, 2009 मध्ये स्थापन झालेली एक सेवाभावी संस्था, समाजातील सर्वात उपेक्षित वर्ग – अपंग व्यक्ती (PWDs) आणि वृद्ध यांच्या सक्षमीकरणासाठी समर्पित आहे. आमचा अनोखा दृष्टीकोन एका विभागाला दुसर्याला मदत करण्यासाठी सक्षम बनवण्याभोवती फिरतो,आमचा प्रवास 13 वर्षांपूर्वी वृद्धांना मोफत मदत देण्याच्या मिशनने सुरू झाला आणि हा उपक्रम पूर्णपणे अशा व्यावसायिकांनी व्यवस्थापित केला आहे, ज्यांनी अपंगत्वावर विजय मिळवला आहे. आमच्या उत्साही टीमच्या समर्पणाद्वारे, आम्ही यूकेमधील 4 शहरांमध्ये आणि भारतातील 74 शहरांमधील वृद्धांना आवश्यक वैद्यकीय, भावनिक आणि लॉजिस्टिक सहाय्य प्रदान करून 26 हजार पेक्षा जास्त विनामूल्य भेटी सेवेसाठी देऊ केल्या आहेत.

आमच्या वचनबद्धतेचा आम्हाला खूप अभिमान आहे. आमच्या संस्थेने बाराशे पेक्षा अधिक अपंग व्यक्तींना करिअरची दिशा शोधण्यात आणि वैयक्तिक विकास साधण्यात मदत करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

आम्ही आमचा प्रवास सुरू ठेवत असताना, आमची पोहोच आणखी वाढवण्याचे आणि गरजूंच्या जीवनावर सखोल सकारात्मक प्रभाव पाडण्याचे आमचे ध्येय आहे. सर्वांसाठी अधिक समावेशक आणि दयाळू समाज निर्माण करण्यासाठी आमच्यात सामील व्हा. माया केअर फाऊंडेशन मध्ये आम्ही आव्हाने स्वीकारतो आणि दिव्यांगांना त्यांना आमच्या अद्वितीय टीम प्रोजेक्ट BINDU च्या मदतीने वृद्धांची सेवा करण्याच्या संधींमध्ये रूपांतरित करतो. एकत्रितपणे, आमच्याकडे तीन संघ आहेत, प्रत्येकामध्ये भिन्न क्षमता आहेत,

व्हॉईस टीम: आमचे दृष्टिहीन दिव्यांग व्यावसायिक कॉल दरम्यान व्हॉइस नोट्सद्वारे गरजूंशी कौशल्याने संपर्क साधतात आणि त्यांना मदत करतात.डेटा टीम: आमचे श्रवण–अशक्त सदस्य उपशीर्षकांसह मूक चॅटद्वारे प्रभावीपणे संवाद साधतात, अखंड परस्परसंवाद सुनिश्चित करतात.पॉवर टीम: लोकोमोटर किंवा न्यूरो अपंग असलेल्या व्यक्तींच्या नेतृत्वाखाली, ते आमच्या प्रयत्नांचे नेतृत्व करतात आणि सकारात्मक बदल घडवून आणतात.आम्ही आमच्या टीमला लॅपटॉप, राउटर आणि स्मार्टफोनची सुविधा देऊ केलेली आहे आणि , Whatsapp Am{U Google Drive सारख्या प्लॅटफॉर्मद्वारे आम्ही त्यांना सक्षम करतो.

माया केअर फाउंडेशन विविध प्रकारची सेवा देण्यासाठी आणि प्रत्येक व्यक्तीला सक्षम करण्यासाठी समर्पित आहे. आम्ही एकत्र काम करत असताना आमच्या करुणेच्या आणि सर्वसमावेशकतेच्या प्रवासात सामील व्हा. एकत्रितपणे, आपण एक सर्व समावेशक समाज निर्माण करू शकतो जो प्रत्येक व्यक्तीच्या सामर्थ्याला महत्त्व देतो आणि स्वीकारतो.सन 2024 सर्वांना आनंदाचे , भरभराटीचे आणि उत्कर्षाचे जावो.

# लाभार्थ्यांच्या प्रतिक्रिया

मी वसंत बाबुलाल माळी वय 72 वर्षे. रा.खुडाणे, ता. साक्री. माया केअर स्वयंसेवक प्रमोद दादा व सुलताना ताई हे मला तब्येत अस्वस्थ व गरगर होत असताना दवाखान्यात उपचारासाठी घरून घेऊन गेले व मला परत घरी आणून सोडले. मला खूप बरे वाटले. माया केअर चे काम खूप मोठे आणि चांगले आहे. याबद्दल माया केअर फाउंडेशनचा मी खूप खूप आभारी आहे.

वसंत बाबुलाल माळी,धुळे
9637686254

***

नमस्कार सर्वांना, मी लीलाबाई कटरे माझे वय 75 आहे. मी चंद्रपूर येथे राहते. माझ्या मुलाने माया केअर बद्दल भरपूर ठिकाणी ऐकले तेंव्हा माझ्या मुलाने हे सर्व मला सांगितले तेंव्हा मला जेंव्हा मदतीची आवश्यकता पडते तेंव्हा मी माझ्या मुलाला फोन करते व माझा मुलगा आपल्या माया केअर च्या टोल फ्री नंबरवर मदतीची विनंती करतो कारण माझा मुलगा दिवसभर कामावर असतो. तेंव्हा चंद्रपूर जिल्ह्याचे समन्वयक श्री. रामदास कामडी सर हे स्वयंसेविका मंदाताई कावडे हिला माझ्याकडे पाठवून माझी औषधे वगैरे आणून देते. माया केअर चे काम खूपच कौतुकास्पद आहे. याआधी अशा प्रकारे मदत आम्हाला कुणाकडूनही मिळाली नाही. पण आता माया केअर मुळे माझे काम सुलभ झाले आहे. याकरिता माया केअर चे, रामदास कामडी आणि मंदाताई यांचे मी खूप खूप आभार मानते.

सौ. लीलाबाई कटरे
7263972557

***

मी माधुरी वैद्य. माझ्या जावेनी मला माया केअर फाउंडेशन विषयीचा व्हाट्सअप मेसेज पाठवला होता. मी हेल्पलाइन नंबर ला फोन केला. माधुरी चरकरी यांनी कॉल घेतला . मी त्यांच्याकडेही संस्थेची चौकशी केली आणि त्यांना मला माझं यूट्यूब चैनल ओपन कसं करता येईल याविषयी विचारलं . सोशल मीडियावर बरेच व्हिडिओज उपलब्ध असतात पण कधी कधी ते नीट समजत नाही प्रत्यक्ष कोणी दाखवलं तर बरोबर लक्षातही राहत. त्यांनी लगेच वंदना दळवी ताईंना ज्या माझ्या घरा जवळच राहतात त्यांना पाठवले. त्यांनी मला त्यासंबंधीचा एक व्हिडिओ दाखवला. आज पाखी दास नावाची तरुणी माझ्याकडे आली. तिने मला नीट समजावून सांगत माझ्या नावाचं यूट्यूब चैनल ओपन केलं तसेच इंस्टाग्राम अकाउंट ही ओपन केला. माझ्यासारख्या सीनियर सिटीझन ला ही खूपच मोठी मदत झाली कारण सोशल मीडियामुळे प्रत्यक्ष बाहेर जाता येत नसल तरी लोकांशी कनेक्ट राहू शकतो. मी माया केअर फाउंडेशन ची खूप आभारी आहे.

माधुरी वैद्य, मुंबई
8104973012

***

नमस्कार मी ओमप्रकाश बंग, संचालक, महेश्वर वानप्रस्थ वृद्धाश्रम नागपूर. एकदा माया केअर चे श्री रामदास कामडी यांनी मला फोन करून वृद्धाश्रमात कार्यक्रम घेण्याची परवानगी विचारली. मी त्यांना आमच्या किरण मॅडम चा नंबर दिला. त्यांनी किरणताई यांची परवानगी घेऊन स्वतः सपत्नीक व करावके सिंगर सैन्यदलात असणारे श्री. सुशील पेंढारकर सपत्नीक येऊन कार्यक्रमाची सुरुवात केली. त्यांनी भक्तिगीताच्या गाण्यापासून ते फिल्मी गाणी आमच्या वृद्ध लोकांसमोर म्हणून दाखवले. एवढा आनंद झाला की आमचे वृदधाश्रमातील वृद्ध त्यांच्या गाण्यासमोर मंत्रमुग्ध होऊन डोलू लागले. त्यांनी गाण्याचा मनमुराद आनंद घेतला. आमच्या येथील वृद्धाने सुद्धा दोन तीन गाणी म्हटली. रामदास सरांनी शेवटी आभार प्रदर्शन केले तेंव्हा आमचे मन खूप भरून आले. व त्यांना सांगितले की अशाच प्रकारचा कार्यक्रम आणखी एकदा झाला तर बरे होईल आणि ते करतीलच अशी अपेक्षा आहे. त्यांनी सांगितले की हा कार्यक्रम माया केअर फाउंडेशन च्या वतीने ठेवण्यात आला होता त्यामुळे मी माया केअर फाउंडेशन चे व रामदास कामडी सरांचे खूप खूप धन्यवाद मानतो.

श्री. ओमप्रकाश बंग साहेब नागपूर.
9921153099

***

नमस्कार, मी भागीरथी एकलव्य क्षीरसागर रा. वढेगाव, लाडगाव रोड. मला आयुष्मान भारत चे पाच लाख रुपये विम्याचे कार्ड काढायचे होते म्हणून माझ्या नातवाने माया केअर फाउंडेशन च्या सोनाली काळे यांना फोन केला होता . तेव्हा त्या आल्या व मला घेऊन गेल्या माझे आयुष्मान कार्ड काढून दिले व परत मला घरी आणून सोडले. त्यांनी खूप चांगल्याप्रकारे मला मदत केली. या आधी सुद्धा माझ्या पतीसाठी आम्ही माया केअर ची मदत घेतली होती. माया केअर चे आम्ही खूप खूप आभारी आहोत.

भगीरथी एकलव्य क्षीरसागर,अहमदनगर
9307388035

***

*** माया केअर फाऊंडेशन तर्फे पुणे, नागपुर, मुंबई येथे रुग्णालयांत मोफत "रुग्णमित्र सेवा" सुरु आहे. ***

**खालील लाभार्थी ज्येष्ठ नागरिकांचे दुःखद निधन झाले. त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली.**



**श्रीमती वसुधा गोडबोले**
**श्री विवेक जोगळेकर**
**श्री विजय पेंडसे**



# माया केअर वृत्त

1. आम्हाला कळविण्यास अभिमान वाटतो की आमच्या संचालिका सौ. मंजिरी गोखले जोशी यांना होरीच इंग्लंड मधील एका समारंभात SheInspires पारितोषिक मिळाले. या समारंभाला ६५० जण उपस्थित होते. दिव्यांग लोकांच्या आयुष्यात सकारात्मक बदल घडविण्याच्या कार्याबद्दल हा सन्मान आहे. तसेच माया केअर इंग्लंड ला ञीशरीं British Workplace Well being स्पर्धेच्या अंतिम फेरीत प्रवेश मिळाला आहे.
2. माया केअर बिंदू टीमची दृष्टिहीन सदस्य सौम्या हिला रोटरी क्लब बेंगळुरू तर्फे Unsung Hero पारितोषिक मिळाले.
3. दिनांक 26.10.2023 रोजी आभाळमाया वृद्धाश्रम माणिकबाग सिंहगड रोड पुणे येथे श्रावण रंग संस्थेतर्फे मराठी व हिंदी गाण्यांचा कार्यक्रम सादर करण्यात आला. यावेळी विनिता महाजन, मकरंद निमोणकर आणि स्वाती पाफळे हे स्वयंसेवक उपस्थित होते.
4. दिनांक 29.10.2023 रोजी जीवन आनंद वृध्द निवास कर्वेनगर पुणे येथे नवरात्री निमित्त स्वयंसेविका डॉ सुवर्णा आगटे यांनी श्री सुक्त पठण सादर केले. तसेच शरयू देशपांडे यांनी गणेश स्तोत्र सादर केले. सुमारे १५ वृद्धांनी या कार्यक्रमाचा आनंद घेतला. स्वयंसेवक श्री महेश कुलकर्णी यांनी या कार्यक्रमाचे व्यवस्थापन केले.
5. दिनांक 29.10.2023 रोजी श्रीमती लाळे यांची पुस्तके जीवन आनंद वृद्धाश्रमात भेट देण्यात आली.
6. दिनांक 31.10.2023 रोजी निवारा, नवी पेठ, जीवन आनंद कर्वेनगर आणि बेहेरे वृद्धाश्रम खराडी पुणे येथे निवासी लोकांना दीपावली शुभेच्छा पत्रे देण्यात आली.
7. दिनांक 24.12.2023 रोजी महालक्ष्मी सोसायटी आनंद नगर, सिंहगड रोड येथे माया केअर च्या सेवांची माहिती देण्यात आली. यावेळी स्वयंसेवक विद्याधर जोशी आणि मकरंद निमोणकर उपस्थित होते.
8. दिनांक 6.11.2023 रोजी शांतीवन वृद्धाश्रम कर्वेनगर येथे स्वयंसेवक श्री जगदीश कुलकर्णी यांनी मराठी व हिंदी गाण्यांचा कार्यक्रम सादर करून तेथील निवासी वृद्धांना मंत्रमुग्ध केले. यावेळी स्वयंसेविका विनिता महाजन उपस्थित होत्या.
9. दिनांक 7.11.2023 रोजी स्वयंसेवक महेश कुलकर्णी यांच्या संकल्पनेतून शांतीवन वृद्धाश्रम कर्वेनगर पुणे येथे वृद्धांबरोबर दीपावलीचा सण साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे संपूर्ण व्यवस्थापन विनिता महाजन यांनी केले. यावेळी तेथील निवासी महिलांनी पणत्यावर रंगरंगोटी केली तसेच उत्तम रांगोळ्या रेखाटल्या. कवयित्री रागिणी जोशी यांनी यावेळी कविता वाचन करून सर्वांना आनंद दिला. यावेळी स्वयंसेविका मीना मोरे आणि मेधा केतकर याही उपस्थित होत्या.
10. दिनांक 21.12.2023 रोजी पुण्यात झालेल्या अपंग सक्षमीकरण परिसंवादाच्या वेळी माया केअरचा स्मृतिचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.
11. दिनांक 23.12.2023 रोजी काही कृतिशील स्वयंसेवकांनी सनवर्ल्ड वृद्धाश्रम खानापूर, जिल्हा पुणे येथे भेट देऊन तेथील वृद्धांशी संवाद साधला. ज्येष्ठ वार्धक्यशास्त्र तज्ञ डॉ रोहिणी पटवर्धन यांनी स्थापन केलेला हा वृद्धाश्रम आहे. यावेळी तेथील श्रीमती सुमन कुलकर्णी आजी यांनी भजन सादर केले तर लेखिका शैला काळे यांनी आपला लेखनाचा अनुभव कथन केला.
12. दिनांक 12.12.2023 आणि 29.12.2023 रोजी अनुक्रमे नांदेड सिटी येथील आई वृद्धाश्रम आणि निवारा नवी पेठ येथे श्रावण रंग संस्थेतर्फे मराठी आणि हिंदी गाण्यांचा कार्यक्रम सादर करण्यात आला. श्रावण रंग संस्थेने आम्हाला वेळोवेळी दिलेल्या अमूल्य सहकार्याबद्दल आणि निःस्वार्थी सेवेबद्दल आम्ही त्यांचे ऋणी आहोत.
13. दिनांक 15.12.2023 रोजी वृंदावन वृद्धाश्रम आनंद नगर सिंहगड रोड येथे स्वयंसेवक श्री जगदीश कुलकर्णी यांनी गाण्यांचा कार्यक्रम सादर करून तेथील वृद्धांना आनंद दिला. यावेळी स्वयंसेविका विनिता महाजन उपस्थित होत्या.

# आमची बिंदू टीम :

बिंदू या संस्कृत शब्दाचा अर्थ लक्ष केंद्रित करणे किंवा इंग्रजीमध्ये फोकस असा आहे. वृद्ध आणि अपंग दोघांना भेडसावणाऱ्या आव्हानांवर उपाय म्हणून बिंदू प्रकल्प उदयास आला. हा प्रकल्प अपंग व्यक्तींची नियुक्ती करतो, त्यांना अनुरूप प्रशिक्षण आणि मार्गदर्शन देतो आणि त्यांना आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र आणि सन्माननीय जीवन जगण्यासाठी सक्षम करतो. अशा तऱ्हेने अपंग व्यक्ती आपल्या कामावर फोकस करतात आणि आपल्या समस्या विसरतात.



पॉवर टीमकडून ज्योती मोरे

माया केअर मधील आमच्या पहिल्या बिंदू सदस्य, ज्या व्हीलचेअर वापरतात, त्यांच्या कडे भारताच्या राष्ट्रीय समन्वयकाचे आदरणीय पद आहे. संस्थेसोबतच्या त्यांच्या १४ वर्षांच्या प्रवासात, त्यांनी 2000 हून अधिक वृद्ध व्यक्तींची स्वयंसेवकांच्या मदतीने समर्पित सेवा केली आहे, त्यांची भूमिका आणि माया केअरच्या मिशन या दोन्हीसाठी त्यांनी अटळ समर्पण दाखवून दिले आहे.



बीपीओ युनिटमधील संध्या अत्राम

ग्रामीण पार्श्वभूमीतून आलेल्या आणि व्हीलचेअर बाउंड संध्या अत्राम बीपीओ युनिटच्या प्रोजेक्ट मॅनेजर या पदावरील त्यांचे समर्पण खरोखरच कौतुकास्पद आहे. कॉर्पोरेटसह ऑनलाईन मीटिंग्ज आयोजित करून, त्या पाच कॉर्पोरेट क्लाएंटसाठी बॅकएंड कार्याचे कुशलतेने व्यवस्थापन करतात . त्यांच्या जबाबदाऱ्यांमध्ये कंपनीचे वेळापत्रक हाताळणे, एचआर हेल्प डेस्क ऑपरेशन्स, दस्तऐवज पडताळणी आणि भाषांतरे यांचा समावेश होतो.

अभिजित माळी, राष्ट्रीय समन्वयक

अभिजित माळी यांच्या नेतृत्वाखाली बिंदू समूहातील 25 पेक्षा अधिक व्यक्ती शहर समन्वयक म्हणून कार्य करीत आहेत आणि त्यांनी इतर समर्पित स्वयंसेवकांसोबत, माया केअर फाऊंडेशनमधील हजाराहून अधिक दिव्यांग व्यक्तींचे जीवन बदलून त्यांना स्वावलंबी बनवले आहे. 2000 हून अधिक वृद्ध व्यक्तींनी संस्थेच्या सेवांचा लाभ घेतला आहे, 1700 पेक्षा जास्त स्वयंसेवकांचे जाळे भारतातील 74 शहरांमध्ये पसरलेले आहे. आणि यूकेमधील चार शहरांमध्ये संस्थेच्या मिशनला पाठिंबा दिला आहे. नुकताच नेपाळच्या काठमांडू शहरामध्ये सेवा सुरू करण्याचे प्रयत्न सुरू आहेत.






डेटा टीमकडून अनुपमा कुलकर्णी

अनुपमा श्रवणयंत्र वापरतात आणि त्या मुक्या आहेत. संस्थेमध्ये प्रशासकीय व्यावसायिक म्हणून काम करण्यासाठी त्यांनी अनेक अडथळे दूर केले आहेत. त्या सक्रियपणे संस्थात्मक शेड्यूल करतात, Complaince व्यवस्थापित करतात आणि गैर–मौखिक संप्रेषणात व्यस्त असतात, त्यांनी संस्थेचे अंतर्गत ऑडिट करण्यात अनेक वेळा महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे.



माधुरी खराटे या माया केअरमध्ये राज्य आणि शहर समन्वयक (राजस्थान, हैदराबाद, पुणे शहर) आहेत. त्यांना लोकोमोटर अपंगत्व आहे. त्या स्पीकर क्लब प्रकल्प आणि देणगी प्रकल्पात गुंतलेल्या आहेत. त्या बुलढाणा, महाराष्ट्र, भारत येथे स्थायिक आहेत आणि त्यांनी कला शाखेची पदवी घेतली आहे . माधुरी या तिच्या आयुष्यात सासरच्या लोकांकडून होणारा छळ आणि अपंगत्वामुळे त्यांच्या पतीने सोडून दिलेला काळ यातून गेल्या आहेत. आज, वृद्धांना कोणत्याही प्रकारचा त्रास न होता दर्जेदार सेवा पुरवल्या जातील याची खात्री करण्यासाठी त्या विविध राज्ये आणि शहरांमधील स्वयंसेवकांसोबत आत्मविश्वासाने फोनवर बोलू शकण्याची ताकद वापरतात. माया केअरसाठी स्वयंसेवक म्हणून मोठ्या कंपन्यांच्या स्वयंसेवकांशी आत्मविश्वासाने बोलायलाही त्या शिकल्या आहेत. माया केअरचे विविध कार्यक्रमही त्या सांभाळतात..

# एका स्वयंसेवकाचा अनुभव

श्री सतीश फिरके हे ज्येष्ठ नागरिक हॅपी कॉलनी कोथरूड,पुणे येथे राहत असून त्यांना दिसत नसल्यामुळे ते दिव्यांग आहेत. बाहेर जाण्यासाठी ते माया केअर स्वयंसेवकाची मदत घेतात.एकदा त्यांचा हात खूप दुखू लागल्यामुळे जवळील क्लिनिक मध्ये जाण्यासाठी त्यांनी मदत मागितली. हातदुखीमुळे त्यांना रात्री झोप लागत नव्हती. मी त्यांना घेऊन गेलो . तिथे दिलेल्या पेन किलर मुळे दुखणे तात्पुरते थांबून परत चालू झाले.हे ह्रदय विकाराशी संबधित आहे का अशी त्यांना शंका आल्यामुळे पुढील तपासणीसाठी त्यांनी सांगितल्यामुळे मी त्यांना ताराचंद हॉस्पिटलला घेऊन गेलो. दिसत नसल्यामुळे सर्व ठिकाणी त्यांना मदत लागत होती.तिथे एडमिशन फॉर्म,वेगवेगळ्या डिपार्टमेंटमधील तपासण्या,औषधे घेणे यासाठी मी मदत केली. तिथे हे दुखणे फिजिओथेरपीने बरे होईल असे डॉक्टरांनी संगितले. त्याप्रमाणे त्यांना नंतर काही दिवस शाश्वत हॉस्पिटलमध्ये फिजिओथेरपी साठी घेऊन गेलो.पुढे यामुळे त्यांना पूर्ण बरे वाटले.
माया केअर स्वयंसेवक मदतीला असल्यामुळे त्यांना आता एकटेपणा जाणवत नाही ,त्यांना खूप आधार वाटतो असे ते नेहमी म्हणतात. अशा मदतीमुळे माया केअर स्वयंसेवक व गरजू ज्येष्ठ नागरिक या दोघांनाही समाधान मिळते.
गजानन ढोरे , माया केअर स्वयंसेवक– पुणे (मो. 9763499633)

# माया केअर फाउंडेशन चा 15 वा वर्धापन दिवस

करुणा आणि सर्वसमावेशकता हे ब्रीद घेऊन ज्येष्ठ नागरिकांना अखंड समर्पित सेवा देणाऱ्या माया केअर फाउंडेशनचा 15 वा वर्धापन दिन दिनांक 9 डिसेंबर 2023 रोजी Persistent Systems एरंडवणे , पुणे येथे साजरा करण्यात आला. प्रथमच या कार्यक्रमास बिंदू टीममधील सुमारे 20 सदस्य उपस्थित होते. यापैकी बहुतांश बिंदू सदस्य पुण्याबाहेरून आले होते. काहींनी यावेळी जीवनातील पहिल्या विमान प्रवासाचा आनंद घेतला. या कार्यक्रमात माया केअर च्या सेवा सर्वांना समजून घेता याव्यात म्हणून अनेक स्टॉल्स ठेवण्यात आले होते.
ज्येष्ठ नागरिक सेवा स्टॉल, बी पी ओ चे काम दाखवणारा स्टॉल, माया केअर इंग्लंड मधील सेवा दाखवणारा स्टॉल , दीनानाथ मंगेशकर हॉस्पिटल रुग्ण मित्र स्टॉल, इंग्लंड मधील सेवा दाखवणारा स्टॉल, ज्येष्ठ नागरिकांचे मनोरंजन करण्यासाठी नर्तिकांचे चयन करणारा नृत्यविद्या स्टॉल इत्यादी प्रमुख स्टॉल होते. या कार्यक्रमाला सर्व स्वयंसेवक, देणगीदार, हितचिंतक, संचालक सौ. मंजिरी गोखले जोशी, श्री.अभय जोशी आणि संस्थापक सदस्य डॉ सुरेश गोखले आणि Persistent foundation (म्हणजेच Persistent Systems चा सामाजिक दायित्व विभाग) चे सर्व मान्यवर उपस्थित होते. यावेळी माया केअर च्या संस्थापिका कै. डॉ विद्या गोखले यांच्या स्मरणार्थ स्थापित केलेल्या Best Bindu Performer पारितोषिकाचे वितरण करण्यात आले. शिखा विश्वकर्मा हिला Persistent Systems चे अजित रानडे यांच्या हस्ते हे पारितोषिक मिळाले.
तसेच दिवंगत बिंदू सदस्य निलेश बोर्डे याच्या स्मरणार्थ माया केअर विषयी घेतलेल्या Pitch competition - Public Speaking स्पर्धेची पारितोषिके वितरित करण्यात आली. ज्योति मोरे, तरूण कुमार आणि आयुष गर्ग यांना persistent foundation चे कमांडर जयंत कोंडे(निवृत्त) यांच्या हस्ते ही पारितोषिके मिळाली. तसेच आपल्या समर्पित सेवेने ज्येष्ठांना आधार देणाऱ्या तसेच अपंग लोकांना रोजगार मिळवून देण्यात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या स्वयंसेवकांचा श्री.अजित रानडे आणि बोर्ड सदस्य श्रीमती मंदाकिनी पानसरे यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी एका खाजगी वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत संचालिका सौ मंजिरी गोखले जोशी यांनी वृद्धांना माया केअरच्या सेवा हक्काने घेण्याचे आवाहन केले. डॉ सुरेश गोखले यांनी नियमित व्यायाम आणि चांगली मनस्थिती ठेवून आपण दीर्घायुषी आणि आरोग्यपूर्ण जीवन जगू शकतो असा संदेश दिला. या कार्यक्रमाची तयारी सहा महिने आधीपासून अतिशय नियोजनबद्ध पद्धतीने स्वयंसेवकांनी केली . कार्यक्रमाच्या वेळी बिंदू टीम मधील दिव्यांग सदस्यांची ने आण, त्यांना वाहन उपलब्ध करून देणे इत्यादी आणि अनेक सेवा स्वयंसेवकांनी दिल्या आणि अभूतपूर्व मानवतेचे दर्शन घडवले. एकूणच एक अतिशय अविस्मरणीय असाच हा सोहळा झाला. Persistent systems ने या सोहळ्याला आपली जागा देऊन जे सहकार्य दिले याबद्दल आम्ही त्यांचे शतशः ऋणी आहोत.

वृत्तांकन – महेश कुलकर्णी ,ज्येष्ठ स्वयंसेवक , पुणे शहर (मो 9004741215)



दीनानाथ मंगेशकर हॉस्पिटल येथे आमच्या स्वयंसेवकासह आमच्या संस्थापिका मंजिरी गोखले जोशी व अभय जोशी सर भेट देताना.



नागपूर येथील काही वृद्ध लोकांना भगवदगीता वाचून दाखविताना आमचे स्वयंसेवक श्री महेश बेलखेडे.



लाईफ केअर हॉस्पिटल नागपूर येथे आमच्या रुग्णमित्र स्वयंसेविका शीतल मेश्राम हॉस्पिटल मधील रुग्णाच्या नातेवाईकांसोबत वार्तालाप करताना.



पुणे येथील आशीर्वाद वृध्दाश्रम येथे वृद्धासोबत अंताक्षरी गाणे म्हणताना आणि आनंद घेताना आमच्या स्वयंसेविका सौ. पदमलता देशपांडे.



संभाजीनगर येथील शरद दासलकर आणि पत्नी यांच्यासह आमचे स्वयंसेवक श्री. अमोल चौहान हितगुज करताना.



स्वयंरोजगार मेळाव्यात अपंगाना रोजगार, व माया केअर फाउंडेशन ला स्मुतीचिन्ह मिळाले. त्यावेळेस दिव्यांग मंत्री आमदार श्री.बच्चू कडू उपस्थित होते.



मुंबई येथील शैलजा प्रभाकर सामल यांच्याशी हितगुज करताना आमच्या स्वयंसेविका वंदना दळवी.



मुंबई येथील श्री दिपक श्रॉफ यांना प्रत्येक महिन्याला रूटीन चेक अप ला हॉस्पिटल ला घेऊन जाताना आमचे स्वयंसेवक हितेंद्र करापे.



पुणे येथील वृध्दाश्रमा मध्ये
मकरंद निमोणकर सराच्या
देखरेखीखली संगीताचा,
गायनाचा कार्यक्रम
सादर करण्यात आला.



कोल्हापूर येथील सौ.माया कर्जगार यांना फळे आणून देऊन
त्यांच्याशी हितगुज करताना आमच्या स्वयंसेविका सौ. संगीता राठोड.



जालना येथे माया केअर
फाउंडेशन तर्फे हॉस्पिटल
मध्ये माहितीपत्रक चिकटवून
जनजागृती करताना जालना
चे आमचे स्वयंसेवक
श्री. कृष्णा डांगे.



चंद्रपूर येथील सौ. लीलाबाई
कटरे यांना फळ आणि
औषधी आणून देण्याची मदत
करताना आमच्या स्वयंसेविका
सौ. मंदाताई कावडे.




बुलढाणा येथील सौ. गोदावरी कौथिर ठेव यांना एटीएम मधून पैसे
काढून देत असताना आमचे स्वयंसेवक श्री प्रदीप काळबांडे.



सातारा येथील
सौ. कुसुम गुरव
यांनी मेडिकल स्टोअर
मधून औषधे आणून
देण्याची मदत करीत
असताना आमच्या
स्वयंसेविका
सौ. सिमा धुमाळ.



कोल्हापूर येथील सौ. रेखा
गुरीहर सगावकर यांना
स्थानिक  नवजीवन हॉस्पिटल
येथे औषधोचारासाठी घेऊन
गेले असताना आमच्या
स्वयंसेविका
सौ. अनुसया दुग्गी.



सोलापूर येथील
सौ. कृष्णा बाई
जमादार यांना मेडिकल
स्टोअर मधून औषधी
आणून देण्याची
मदत करीत असताना
आमच्या स्वयंसेविका
शुभांगी जाधव.

Maya CARE Foundation

The next best thing to family

भावनिक/बौद्धिक /औपचारिक समर्थनासाठी वरिष्ठ नागरिकांना मोफत 90 मिनीटांच्या भेटी

✻ **सेवा** ✻

त्यांना डॉक्टर / रेडियोथेरेपी / लसीकरण / सामाजिक कार्यक्रम थिएटर / बँक / कागदपत्रे / लेखन / वाचन / खरेदी / गॅझेटस वापरुन / व्हिडिओ कॉल करण्यात मदत

## MAYA CARE NATIONAL HELPLINE : 1800 572 1343

| CITY | FOR WHATSAPP |
| --- | --- |
| मुंबई,पुणे,कोल्हापूर,सांगली,सातारा,सोलापूर,लातूर, नागपूर,नाशिक,परभणी,अहमदनगर,छ.संभाजीनगर,जालना,जळगाव,धुळे,अमरावती,वर्धा,अकोला,बुलढाणा,यवतमाळ, चंद्रपूर,बीड,नंदुरबार,बेंगलोर,हैदराबाद,चेन्नई,दिल्ली,सुरत,वडोदरा,अहमदाबाद,गांधीनगर,कच्छ,चंदीगड,जालंधर,लुधियाना,अबोहर,जबलपूर,उज्जैन,भोपाळ,छतरपुर,ग्वाल्हेर ,इंदोर,रीवा,झांसी,लखनऊ,कानपूर,कोइंबतूर,पाँडिचेरी,पानिपत,गुवाहाटी,हहलखंडी,भुवनेश्वर,अंगूल,संबलपूर,जयपुर,जोधपुर,उदयपूर,ढोलपूर,जैसलमेर,बराण,कोची, तिरुअनंतपुरम,कोलकत्ता,पूर्व मिदनापूर,पश्चिम मिदनापूर,हावडा,बांकुरा,मालदा,उत्तर २४ परगणा,हरिद्वार,डेहराडून, इंग्लंड-लंडन, केंब्रिज, मिल्टन केन्स, मँचेस्टर. | 9552510400<br>9552510411<br>8055995966 |

**Website - www.mayacare.org | Email : service@mayacare.org**

तुम्ही जेष्ठ नागरिक आहात आणि तुम्ही एकटे किंवा दुकटे राहात आहात किंवा जेष्ठ नागरिक आहात आणि कुटुंबात राहात आहात पण अपंग आहात तर आम्ही आपल्याला संपूर्णपणे मोफत मदत करू शकतो:

१) किराणा , भाजी , फळफळावळ औषधे आणून देणे .
२) डॉक्टरकडे , घेऊन जाणे आपण रुग्णालयात दाखल असल्यास आय सी यु च्या बाहेर थांबणे .
३) आपल्याला धार्मिक किंवा इतर पुस्तके, वृत्तपत्रे वगैरे वाचून दाखविणे, लेखन करणे .
४) आपल्या बँकेत जाऊन पैसे काढणे ,पैसे भरणे, चेक भरणे .
५) आपल्याला एसटी स्टँड , रेल्वे स्टेशन , विमानतळ येथे पोंहचविणे किंवा तेथून घरी सुखरूप पोहचविणे .
६) मोबाईल फोन वापरणे , कॉम्प्युटर वापरणे इत्यादी साठी मदत करू .
७) या शिवाय इतर अनेक गोष्टीसाठी आम्ही तुम्हाला मदत करू.

देणगीसाठी QR Code

माया केअर कोणतीही नर्सींग आणि तातडीची सेवा देत नाही.

✻ आपले अभिप्राय व सुचना यांचे स्वागत आहे. आपण ई-मेल करुन कळवू शकता.

**देणगीसाठी आयकर सवलत आहे.**

**NAME OF THE A/C - MAYA CARE FOUNDATION**

**NAME OF THE BANK : ICICI BANK LIMITED** (BRANCH : TILAK ROAD,PUNE)
**ACCOUNT NO. : 187501000462**
**IFSC CODE : ICIC0001875**

PRINTED MATTER

बुक-पोस्ट

**FROM,**


**माया केअर फाऊंडेशन**
1214 शुक्रवार पेठ, आफ्रिका हाऊस,
सुभाषनगर, गल्ली नं.04, पुणे - 411002.


केवळ खाजगी वितरणासाठी / विनामूल्य


Printed At - Khadilkar Process
Tel.: 020-24477059


**TO,**

श्री/श्रीमती ______________________